# महाराष्ट्र शासन

सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१

Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२


क्रमांक - ग्रीन क्लब कार्यशाळा/ पुणे विभाग/ 4790 दि. १५/०२/२०२३.

प्राचार्य,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित
व विनाअनुदानित महाविद्यालये,
**अहमदनगर जिल्हा.**

**विषय :** महाराष्ट्रशासन व युनिसेफच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन 'युवकांच्या (youth) सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण तसेच पाण्याची बचत' या अभियान अंतर्गत ग्रीन क्लब सदस्य यांचे एक दिवसीय क्षमता बांधणी प्रशिक्षणा बाबत.

संदर्भ:
1. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मार्गदर्शक सूचना क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र. १२९/विशि-५ दि. १३ जानेवारी २०२३
2. महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांचे पत्र क्र. उशिसं/युनिसेफ २०२३/७३२४ दि. २०.०६.२०२३
3. राज्य प्रकल्प सचिवालय: युनिसेफ व महाराष्ट्र शासन संयुक्त अभियान आढावा बैठक इतिवृत्त क्र. उशिसं/UNICEF/म.वि.-१/१५०३८ दि. २३.११.२०२३
4. महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांचे पत्र क्र. उशिसं/UNICEF/म.वि.-१/१६०९५ दि. ३०.११.२०२३.

उपरोक्त विषयास अनुसरून महाराष्ट्र शासन व युनिसेफच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन 'युवकांच्या (youth) सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण तसेच पाण्याची बचत' या अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत राज्यातील १३ निवडक जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयात (उच्च व तंत्रशिक्षण) शिकत असलेल्या युवक/युवतींची वातावरण, हवामानबदल आणि पाणी बचत या विषयी माहिती वृद्धिंगत करणे, कौशल्य विकसित करण्यासाठी प्रशिक्षणे घेणे, शैक्षणिक संस्थास्तरावर ग्रीनक्लबची स्थापना करणे, पाणीबचतीच्या उपाययोजना राबविणे, इत्यादी उपक्रम राबविले जाणार आहेत.

'युवकांच्या (youth) सहभागाने नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण तसेच पाण्याची बचत' (YEWS) या कार्यक्रमांतर्गत **अहमदनगर जिल्ह्यातील** स्थापन करण्यात आलेल्या ग्रीन क्लब अंतर्गत समाविष्ट असलेल्या विद्यार्थी प्रतिनिधींच्या क्षमता बांधणीसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे **अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर** या ठिकाणी शुक्रवार दिनांक: **२३ फेब्रुवारी, २०२४** रोजी आयोजन करण्यात येत आहे. सदरील क्षमता बांधणी प्रशिक्षणास ग्रीन क्लब फॅकल्टी कोऑर्डीनेटर यांनी आपल्या महाविद्यालयातील एका ग्रिन क्लब सदस्यासह वेळेत उपस्थित राहणे संदर्भात आपल्या स्तरावरून तत्काळ अवगत करण्यात यावे.

जिल्हा नोडल अधिकारी यांनी युनिसेफ, ACWADAM, पर्यावरण शिक्षण केंद्र यांच्या प्रतिनिधीं यांच्या मदतीने आयोजन करावे, सदरील कार्यशाळेमध्ये ग्रीन क्लबच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या पाणी बचतीच्या उपाय योजना, दैनंदिन पाणी बचत व पाणी बचतीच्या नोंद कश्या कराव्या, ग्रीन क्लब विद्यार्थी प्रतिनिधींची जबाबदारी, आणि क्षमता बांधणी करणे संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

नोंदणी साठी गुगल फॉर्म भरावा:-https://forms.gle/azSkEonRND6ZCSQZ8

टिप: माहितीस्तव प्रशिक्षण कार्यक्रमाचे माहिती पत्रक सोबत जोडलेले आहे.

(डॉ. केशव तुपे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

प्रत -

१. मा. शिक्षण संचालक ( उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे.
२. श्री. बालाजी व्हरकट Program Officer | Climate, Environment and DRRUNICEF Maharashtra
३. श्रीमती उमा असलेकर, कार्यकारी संचालक, अँडवान्सड सेंटर फॉर वॉटर रिसोर्सेस डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट (ACWADAM)
४. श्री. अवधूत अभ्यंकर, प्रकल्प समन्वयक, ‘युवकांच्या (Youth) मार्फत नैसर्गिक संसाधनांचे सरंक्षण व पाण्याची बचत संयुक्त अभियान’.
५. श्री. मधुकर लेंगरे,स्टेट लाइजनिंग ऑफिसर, ‘युवकांच्या (Youth)मार्फत नैसर्गिक संसाधनांचे सरंक्षण व पाण्याची बचत संयुक्त अभियान’(YEWS)
६. जिल्हा नोडल अधिकारी अहमदनगर.